ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १८ सप्टेंबर, १९५७ | अंक ३८

## विविध माहिती

**अणुशक्तीची अतिशय गरज**—भारताच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं डब्लिन येथें शास्त्रज्ञांच्या संघटनेपुढें भाषण करतांना असें सांगितलें कीं, जगाची लोकसंख्या सध्यांच्या वेगानें वाढत गेल्यास १०० वर्षांत ती दुप्पट होईल. ह्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी अमेरिका आज ज्या प्रमाणांत औद्योगिक शक्ति वापरीत आहे त्याच प्रमाणांत वापरली गेल्यास १०० वर्षांच्या आंतच खनिज इंधनाचे साठे संपतील. म्हणून अणुशक्तीचा विकास करणें फार जरूरीचें आहे.

**भारताच्या चित्रपटांची पाकिस्तानांत आयात**— १९५५ सालीं झालेल्या करारास अनुसरून पाकिस्तान सरकारनें भारताच्या १९ चित्रपटांना पाकिस्तानांत आयात करण्यास मंजुरी दिली आहे. चित्रपट आयात करणाऱ्यानें एक पाकिस्तानी चित्रपट भारतांत निर्यात केल्यावरच त्याला भारताचा चित्रपट पाकिस्तानांत आणतां येईल. दर दोन महिन्यांनीं तीन भारतीय चित्रपटच आयात करतां येतील.

**सिगारेटस्‌ची किंमत वाढणार**—ब्रिटनमधील नागरिकांना कांहीं प्रकारच्या सिगारेटस्‌साठी व तंबाखूसाठी लवकरच अधिक किंमत द्यावी लागणार आहे. २० सिगारेटस् असलेल्या पाकिटाची किंमत १ पेनीनें वाढविण्यांत येणार असून तंबाखूची किंमत औंसामागें अर्ध्या पेनीनें वाढविण्यांत येणार आहे.

**परदेशांकडून कर्जाची गरज**—भारत पाश्चात्य देशांकडून १०० कोटी डॉलर्सचें कर्ज मिळविण्याच्या खटपटींत आहे, अशी वार्ता न्यूयॉर्क टाइम्सनें प्रसिद्ध केली आहे. ह्या रकमेपैकीं ५० ते ६० कोटी डॉलर्स अमेरिकेकडून मिळविण्याचा प्रयत्न होत असून बाकीची रक्कम ब्रिटन, आंतरराष्ट्रीय बँक व खाजगी बँका ह्यांच्यामार्फत मिळविण्याची खटपट होत आहे.

**भारत-झेकोस्लोव्हाकिआ करार**—भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांत १९५३ सालीं व्यापारी करार करण्यांत आला. तेव्हांपासून त्याची मुदत दरसाल वाढविण्यांत आली आहे. उभयता देशांमधील व्यापारांत भारताच्या बाजूनें प्रतिकूल तफावत आहे. झेकोस्लोव्हाकिआकडून घेतलेल्या मालाची किंमत रुपयांत चुकती करण्याविषयीं वाटाघाटी चालूं आहेत.

**जंगलविषयक अभ्यास**—फिनलंड व भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें जंगलांची वाढ व त्यांचा अधिक चांगला उपयोग ह्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी ४ हिंदी अधिकारी फिनलंडला जाणार आहेत. भारतांत जंगलांचा उपयोग करून कोणते उद्योगधंदे काढतां येतील तें पहाण्यासाठी दोन फिनिश तज्ज्ञहि भारतांत येणार आहेत.

**ओरिसांतील दारूबंदी रद्द होणार ?**—पंचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा उभारण्यास मदत व्हावी म्हणून ओरिसाचें सरकार दारूबंदी रद्द करण्याचा विचार करीत असल्याचें समजतें. राज्याच्या योजनेच्या चालू वर्षांत १६ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार असून त्यापैकी ३ कोटी रुपये राज्य सरकारनें उभारावे असें सुचविण्यांत आलें आहे.

**किसानांसाठी खास गाड्या**—किसानांना भारतामधील विकासकार्यांची माहिती करून देण्यासाठी भारताच्या रेल्वेनें १९५५ सालापासून खास गाड्या सोडण्याची व्यवस्था केली होती. ह्या व्यवस्थेस अनुसरून आतांपर्यंत किसानांसाठी २७ खास गाड्या सोडण्यांत आल्या. सुमारें ११,६०० किसानांनीं सवलतीच्या प्रवास-योजनेचा फायदा घेतला. खास गाड्यांनीं १ लाख, ४० हजार मैल प्रवास केला.

**कापड कामगारांना मिळणारा बोनस**—अहमदाबादमधील १ लाख, २० हजार कापड कामगारांना १९५६ सालचा बोनस म्हणून दसऱ्याच्या सुमारास १·२ कोटी रुपये देण्यांत येणार आहेत. कामगार व गिरणीमालक ह्यांच्यांत बोनससंबंधीं झालेल्या कराराप्रमाणें हा चौथा बोनस देण्यांत येत आहे. अहमदाबादमधील ६६ गिरण्यांनीं १९५६ सालीं १५ कोटींचा नफा दाखविला आहे.

**कापडाची सहकारी गिरणी**—मद्रास राज्यांतील रामनाद जिल्ह्यांत कापडाची एक सहकारी गिरणी काढण्यास परवाना देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या गिरणींत १२ हजार चात्या बसविण्यांत येतील. जिल्ह्यांतील विणकर आणि कापूस पिकविणारे शेतकरी ह्यांच्या सहकार्यानें व त्यांच्या मदतीसाठी कारखाना काढण्यांत येत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सर जनार्दन मदन स्मारक फंड

कै. सर जनार्दन मदन ह्यांच्या स्मारकासाठी बॉंबे स्टेट को. युनियनतर्फे एक फंड जमविण्यांत येत आहे. पुणें येथील को. ट्रेनिंग कॉलेजांत स्कॉलरशिपा व फेलोशिपा ठेवण्यासाठी आणि मुंबई राज्यांतील सहकारी ट्रेनिंग स्कूलसमधील विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्यासाठी फंडाचा विनियोग करण्यांत येणार आहे. फंडाला आतांपर्यंत खालीलप्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत :—

| | रुपये |
|---|---|
| श्री. जी. एच. ठाकोर, मुंबई | २१ |
| श्री. सी. सी. स्वामी, धारवाड | ११ |
| प्रो. डी. जी. कर्वे, मुंबई | १०० |
| श्री. बी. पी. पटेल, मुंबई | १०१ |
| श्री. एम. एस. कुलकर्णी, कोल्हापूर | १० |
| श्री. जी. एम. लाड, मुंबई | २५ |
| श्री. डी. ए. शहा, पुणें | २५ |
| श्री. व्ही. एल. मेहता, मुंबई | २५१ |
| श्री. व्ही. एम. ठाकोर, ग्वाल्हेर | २५ |
| श्री. एम. बी. जोशी, नाशिक | १० |
| श्री. एफ. एन. राणा, पुणें | १०० |
| सारस्वत को. बँक लि., मुंबई | ५०० |
| श्री. व्ही. पी. वर्दे, मुंबई | १०१ |
| जंबुसर पीपल्स को. बँक, | २५ |
| श्री. एन. पी. भागवत, पुणें | ५१ |
| कोडिनार को. बँकिंग युनियन | १०१ |
| पुणें, म्यु. कॉर्पो. एम्प्लॉ. को. बँक | ११ |
| एस. भिलाडवाला पार्डी पीपल्स को. बँक | १०१ |
| सुरत डि. को. बँक | १०१ |
| स्टूडंट्स स्टोर्स, जळगांव को. स्कूल | १०१ |
| सुरत डि. को. बोर्ड | १०० |
| सी. के. पी. को. बँक | १० |
| भुसावळ पीपल्स को. बँक | ५१ |
| खेडा पीपल्स को. बँक | २५ |
| बॉंबे स्टेट को. बँक | २,००० |
| सर चुनीलाल मेहता, मुंबई | १०० |
| लक्ष्मी सें. को. बँक | २५ |
| श्री. आर. व्ही. नाडकर्णी, पुणें | २१ |
| महाराष्ट्र रि. को. स्कूल पुणें (शिक्षक व विद्यार्थी) | १५७ |
| श्री. एन. जी. उभयकर, मुंबई | १५ |
| खेडा डि. सें. को. बँक | २५१ |
| सुरत पीपल्स को. बँक | १०१ |
| पुणें सें. को. बँक | २५१ |
| श्री. एन. जी. विंचुरकर, नाशिक | ५.२५ |
| श्री. बी. बी. श्रॉफ, बलसार पी. को. बँक | २५ |
| शामराव विठ्ठल को. बँक | ५१ |
| मर्कंटाइल को. बँक, मुंबई | ५१ |
| पंचमहाल्स डि. को. बँक | २५ |
| एन. जी. इस्माइलिया मोमिन्स को. बँक, सिद्धपूर | ५१ |
| श्री. सी. ए. व्यास, उमरेठ | १० |
| बसवेश्वर अर्बन को. बँक, बागलकोट | २५ |
| दोहद अर्बन को. बँक | २५ |
| कराड को. परचेस अँड सेल सोसायटी | ५० |
| बेळगांव डि. इंडस्ट्रिअल को. बँक | १०१ |

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक,
बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-८-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षे | : | २¾ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | ३½ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधी माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

बा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

# अर्थ

बुधवार, ता. १८ सप्टेंबर, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## परदेशीय हुंडणावळीच्या तुटवड्याला तोंड देतां येईल

अर्थशास्त्राला वाहिलेल्या प्रसिद्ध 'ईस्टर्न इकॉनॉमिस्ट' ह्या नियतकालिकाचे संपादक मि. एरिक डकॉस्टा नुकतेच युरोपचा दौरा करून परत आले आहेत. त्यांनीं आपल्या या अनुभवासंबंधीं मुंबई येथें एक व्याख्यान दिलें. ते म्हणाले कीं, परदेशांत भारतावरील विश्वास डळमळूं लागलेला आहे. अशा परिस्थितींत आपल्या पौंडी गंगाजळीवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. आपला हा निधि स्थिर राखला तरच परदेशांचा विश्वास पुन्हां बसूं शकेल. परदेशीय हुंडणावळीसंबंधीं जें संकट उत्पन्न झालें आहे तें बरेंच गंभीर स्वरूपाचें आहे ह्यांत शंका नाहीं. पण धोरण बरोबर ठेवण्यांत आल्यास त्याला तोंड देतां येईल. आज अशी परिस्थिति आहे कीं भारताला दिलेलीं कर्जें परत मिळतील किंवा नाहीं आणि उधारीवर दिलेल्या मालाच्या उशिरा घ्यावयाच्या किंमती वेळेवर चुकत्या केल्या जातील कीं नाहीं ह्याविषयीं परदेशांत शंका उत्पन्न झाली आहे. परदेशीय भांडवल—विशेषतः अमेरिकेचें भांडवल—भारतांत गुंतविण्यास उत्तेजन देण्यासाठी कांहीं खास धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. आपल्या धोरणांत एक भाग अल्पकालीन, तात्पुरत्या स्वरूपाचा व दुसरा दीर्घकालीन स्वरूपाचा असावा. अल्पकालीन धोरणाच्या कालांत परदेशांतून शेतीचा माल आयात करावाच लागेल. कारण, वस्तूंच्या किंमती मर्यादेंत ठेवण्याचा तोच एक मार्ग आहे. दीर्घकालीन धोरणांत शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या उत्पादनांत वाढ होण्यासाठी प्रलोभनें ठेवण्यांत आलीं पाहिजेत. अशा धोरणांत सध्यांच्या करविषयक तरतुदींत कांहीं बदल करावा लागेल हें उघडच आहे. सध्यां सरकारला ज्या अडचणींना तोंड द्यावें लागत आहे, त्या मुख्यतः शेतीच्या उत्पादनांत वाढ न झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या आहेत.

## सिलोनमधील परदेशीय भांडवल भीतिग्रस्त

सीलोनच्या सरकारनें देशाचें औद्योगीकरण करून लोकांचें जीवनमान वाढविण्यासाठी परदेशांतील भांडवलाला आवाहन केलें आहे. परंतु परदेशीय भांडवल गुंतलेल्या ज्या कंपन्या सीलोनमध्यें आहेत त्यांच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण करणारी भाषणें सत्तेवर असणाऱ्यांपैकी कांहीं जण करीत आहेतः त्यामुळें सीलोनमधून परदेशी भांडवल जलदीनें काढून घेण्यांत येत आहे असें समजतें. परदेशांतील मजूर सीलोनमध्यें येऊं देण्याबाबत सरकारचें धोरण अनिश्चित आहे. त्याचप्रमाणें परदेशी कंपन्यांवर राष्ट्रीयीकरणाची कुऱ्हाड कोसळण्याचीहि भीति उत्पन्न झाली आहे. त्यामुळें १९५२ सालापासून सीलोनमधून ३५·४ कोटी रुपयांचें भांडवल परांगदा झालें आहे असें म्हणतात. गेल्या वर्षी तर भांडवलाचें बहिर्गमन फार मोठ्या प्रमाणावर झालें. सुमारें १२·८ कोटी रुपये भांडवल सीलोनमधून काढून घेण्यांत आलें. बाहेर गेलेला हा पैसा आर्थिक व्यवहाराच्या मामुली पद्धतीनें म्हणजे दरसाल देशाबाहेर पाठविण्यांत येणारा नफा अगर भागावरील डिव्हिडंड ह्यांच्या रूपानें गेलेला नाहीं. हा पैसा खाजगी मालकीचे भाग–भांडवल, बचत केलेल्या रकमा, स्थावर मालमत्ता विकून आलेले पैसे, विम्याचे हप्ते, प्रॉव्हिडंट–फंडाच्या रकमा, ह्यांच्या रूपानें बाहेर गेलेला आहे. ह्या उलट, १९५२–५६ ह्या कालांत सीलोनमध्यें फक्त २·०५ कोटी रु. बाहेरून आले. भारताच्या व पाकिस्तानच्या नागरिकांना सीलोन सोडून जाण्याच्या नोटिसा देण्यांत आल्या आहेत. ह्या नागरिकांनीं १९५५ सालीं ३·७ कोटी रुपये आपणाबरोबर बाहेर नेले. १९५६ सालीं त्यांनीं ३·९ कोटी रुपये नेले. सिलोनमधील व्यापारी बँकांनीं बिगर–जरूरीच्या वस्तू आयात करण्यासाठी देण्यांत येणाऱ्या कर्जावर बंधनें घालण्यास सुरवात केली आहे.

## अणुशक्तीचें वीजकेंद्र अहमदाबादला उभारा

अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचें संकलिपत केंद्र अहमदाबादमध्यें उभारण्यांत यावें अशी मागणी गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स व अहमदाबाद गिरणीमालक संघ ह्यांनीं केली आहे. गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सनें ह्यासंबंधीं भारताच्या अणुशक्तीखात्याला एक निवेदन पाठविलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणारी वीज अजून स्वस्त दरानें पुरवितां येण्यासारखी नाहीं, हें खरें; परंतु ह्या बाबतींत होत असलेल्या तांत्रिक सुधारणा लक्षांत घेतां सुमारें दहा वर्षांत तसें करणें शक्य होईल असें दिसतें. ब्रिटनचा ह्याविषयींचा अनुभव उत्तेजक आहे. कॅनडामध्येंहि १९६५ च्या सुमारास अणुशक्तीची वीज स्वस्त मिळूं लागेल असें दिसतें. गेल्या तीन वर्षांत अहमदाबादमधील कापडगिरण्या व इतर औद्योगिक संस्था ह्यांना लागणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत २७ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें उत्तर गुजरातमधील विजेच्या खपांतहि खूप वाढ झालेली आहे. अहमदाबादच्या आसपास एका 'इंडस्टिअल एस्टेट'ची स्थापना करण्याचें घाटत आहे. त्यामुळें नजीकच्या भविष्यकाळांत विजेच्या शक्तीची मागणी खूपच वाढणार आहे. अहमदाबाद शहरांत कापडाच्या ६६ गिरण्या असून त्या देशांतील कापड उत्पादनाच्या एकचतुर्थांश कापड तयार करतात. गिरण्यांना लागणारें जळण व औद्योगिक शक्तीसाठी दरसाल सुमारें ५ लाख टन कोळसा दूरच्या ठिकाणाहून आणावा लागतो. अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणारी वीज स्वस्त दरानें मिळूं लागल्यावर कापडाच्या किंमतींत फरक पडल्याशिवाय राहणार नाहीं. उत्पादनाचा खर्च कमी झाल्यामुळें कापडाच्या किंमती कमी करतां येतील. त्याशिवाय अहमदाबादच्या आसपास छोटे व मध्यम प्रतीचे कारखाने निघण्यासहि साह्य होईल.

**नरगुंदसाठी पाणीपुरवठा**—धारवाड जिल्ह्यांतील नरगुंद ह्या गांवासाठी पाणी-पुरवठा करण्याची योजना म्हैसूर सरकारनें मंजूर केली आहे. योजनेसाठी १ लाख. ७५ हजार रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकी निम्मी रक्कम राज्य सरकार मदत म्हणून देणार आहे.

## पाकिस्तानमधील चिंताजनक आर्थिक परिस्थिति

पाकिस्तानच्या स्टेट बँकेच्या ९ व्या वार्षिक सभेत बोलतांना बँकेचे गव्हर्नर मि. अब्दुल कादर ह्यांनीं पाकिस्तानमधील खाला-वलेल्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करून थोडीबहुत त्याची कारण-मीमांसाहि केली आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं गेल्या वर्षभर पाकिस्तानचीं आर्थिक दुःस्थिति हा चिंतेचा विषय झाला आहे. आज पाकिस्तानपुढें जे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्यांचें मुख्य कारण म्हणजे घटलेलें उत्पादन हें आहे. हिंदुस्तानची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिति झाल्यानंतर विकास-योजनांवर बराच पैसा खर्च करण्यांत आला. परंतु प्रत्यक्ष वाढत्या उत्पादनाच्या दृष्टीनें पहातां फलनिष्पत्ति उत्तेजनकारक नाहीं असें दिसून येतें. शेतीच्या उत्पादनाबाबत ज्या प्रवृत्ती दिसून येत आहेत त्या विशेष चिंता उत्पन्न करणाऱ्या असून त्यांच्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनावर अवर्षण व अतिवृष्टि ह्यांचाहि परिणाम झालेला आहे. तथापि इतरहि कारणें दुर्लक्ष करण्यासारखीं नाहींत. पाटाचें पाणी मिळ-णाऱ्या सोयी ज्या प्रमाणांत उपलब्ध करण्यांत आल्या त्या प्रमाणांत लागवडीखालील जमिनींत वाढ झालेली नाहीं. देशाच्या आर्थिक परिस्थितीचा तोल बिघडलेला आहे. शेतीचें उत्पादन जागच्या जागींच थबकून आहे. उलटपक्षीं, लोकसंख्या मात्र वाढत आहे. त्याचबरोबर विकासयोजनांवरील खर्चहि वाढत चाललेला आहे. आर्थिक परिस्थितीचा तोल जाण्याचीं हीं प्रमुख कारणें आहेत. चलनवृद्धीचा धोकाहि वाढत चाललेला आहे. त्याला तोंड द्यावयाचें असेल तर पैशाची मागणी कमी तरी करण्यांत आली पाहिजे, अगर देशांत उपलब्ध असणाऱ्या वस्तूंचा पुरवठा तरी वाढविण्यांत आला पाहिजे. पुरवठा वाढविण्यासाठी आयात अधिक करावी लागेल अगर घरचें उत्पादन वाढवावें लागेल.

---

## आयुर्विम्याचा धंदा वाढण्याचा विश्वास

आयुर्विम्याचा धंदा करणाऱ्या खाजगी कंपन्या सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन आपल्या मालकीचें आयुर्विमा कॉर्पोरेशन स्थापन केलें. १९५६ च्या प्रारंभींच ही घटना घडली. त्यानंतर आयुर्विम्याच्या नव्या धंद्यांत घट झाल्यानें ह्या व्यवसायाबद्दल संबंधितांत टीका होऊं लागली. १९५४ व १९५५ मध्यें खाजगी कंपन्यांनीं मिळविलेल्या धंद्याच्या मानानें १९५६ सालीं नवा धंदा बराच कमी झाला हें खरें. पण आतां धंद्याची पुनर्घटना पूर्ण झाल्यानें अधिक काम मिळविण्याच्या प्रयत्नांना जोर येईल आणि १९५७ मध्यें २५० कोटी रुपयांचें नवें काम मिळवितां येईल असा विश्वास लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनच्या जनरल मॅनेजरनीं व्यक्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं कंपन्यांच्या पुनर्घटनेचें काम उरकण्यांत १९५६ साल बहुतांशीं गेलें. त्यामुळें धंद्याचा विस्तार करण्याकडे पुरेसें लक्ष देतां आलें नाहीं. भारतांत आयुर्विम्याचा धंदा करणाऱ्या २४३ कंपन्या होत्या आणि त्यांची एकूण मालमत्ता ४११ कोटींची होती. नोकरवर्गाच्या नोकरीच्या परिस्थितीतहि पुष्कळ फरक होता. सुमारें ५० लाख विमापत्रकें चालू होतीं. इतक्या मोठ्या व्यापाची नव्यानें पद्धतशीर पुनर्रचना करण्याचें काम बरेंच गुंतागुतीचें होतें. आतां तें संपल्यामुळें नवा धंदा मिळविण्याचें कार्य जोरानें सुरू झालें आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत १११.६५ कोटी रुपयांचे विमा अर्ज कॉर्पोरेशनकडे आले आणि ७२.५४ कोटी रुपयांच्या नव्या पॉलिसीज देण्यांत आल्या. कॉर्पोरेशन अस्तित्वांत आल्यावर दरमहा सरासरी ३.३ कोटी रु. च्या नव्या पॉलिसी देण्यांत येत असत. आतां दरमहा १२ कोटी रुपयांच्या पॉलिसीज देण्यांत येत आहेत.

## CONFERENCE OF JOINT-STOCK COMMERCIAL BANKS WORKING IN MAHARASHTRA

### Appeal to Bankers for Suggestions and Participation

During an informal meeting of a few bankers in mofussil and in Poona, it has been casually suggested that a Conference of Joint-Stock Commercial Banks working in Maharashtra, having predominantly Maharashtrian Capital, and/or having their major field of activity in Marathi-speaking areas of Bombay State and the adjoining boundaries, may be called at a central place like Poona in the month of October or November, 1957 on convenient dates. It needs no emphasis that such a common meeting goes a long way in developing personal and social contact between the members working in the common field of banking and also in solving many common problems before them by mutual discussions and united action. This may also prove a very useful platform to place the common difficulties before the authorities of the Reserve Bank and at Government quarters.

Such an activity may, several times, takes a lead in chalking out common schemes of mutual help for rendering better and efficient service to the society, and also helps the economic development of the region.

We, therefore, appeal to you to give your serious thought to this idea and request you to please send us your suggestions for developing this idea into a reality. Your suggestions are therefore, keenly awaited.

We, therefore, request you to please send us your suggestions. The success of the conference will depend upon your cooperation in the matter. Your latest balance sheet may please be sent to us.

*Yours faithfully,*

*For Poona Bankers Association*

**C. V. Joag** ( Bank of Maharashtra Ltd. )
**G. G. Sathe** ( Bank of Poona Ltd. )
**K. B. Mujumdar** ( Dena Bank Ltd. )
Members Ex. Committee
**W. G. Altekar** ( Poona Cent. Coop. Bank Ltd. )
**D. N. Gandekar** ( Bank of Maharashtra Ltd. )
Secretaries.

*For Deccan Banks Association*

**K. P. Joshi**, President.
**M. V. Shingare**, Secretary.
**R. B. Salvekar**, Asst. Secretary.

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

चेअरमन : मो. कुं. फिरोदिया, बी. ए.

जनरल मॅनेजर : कृ. ध. जोशी

मॅनेजर : त्र्यं. वि. निसळ, सी. ए. आय. आय. बी.

नगर शहरामध्यें आज सहा मोठ्या बँकांच्या शाखा असल्या-मुळें धंद्यामध्यें खूपच चढाओढ (Competition) सुरू झाली आहे. अशाहि परिस्थितींत जनतेचा बँकेवर असलेल्या नितांत विश्वासामुळें बँकेस प्रगति करतां आली व अहवालसालीं नफाहि वाढला. इतर बँकांच्या चढाओढी (Competition) मुळें व व्यवहारांत भासणाऱ्या नाणेटंचाईमुळें ठेवींच्या प्रमाणांत वाढ होण्याची शक्यता कमी झाली आहे. अशा परिस्थितींत बँकेच्या बोर्डास मोठ्या दक्षतेनें आपला कारभार करावा लागणार आहे. बँकेनें सहकारी क्षेत्रांत एक लौकिक मिळविला आहे. तो टिकवा-वयाचा असल्यास बँकेस आपली कार्यक्षमता वाढवून काटकसरीनें कारभार करावा लागेल. कर्जदारांना नियमाप्रमाणें कर्जाची फेड करावी लागेल व ठेवीदारांचा विश्वास अधिक वाढेल अशा योजना बँकेस आंखाव्या लागतील. बचत योजनांचा प्रचार करून, बँकेंतील ठेवी जर बँका वाढवूं शकल्या नाहींत तर त्यांचेकडून देशाची गरज भागविली जाणार नाहीं.

सन १९५५-५६ मध्यें बँकेनें नवीन कॅशक्रेडिट्स दिलीं. परंतु अहवालसालीं बँकेस नवीन कर्जें देतां आलीं नाहींत. गेल्या चार-पांच वर्षांपासून डायरेक्टर बोर्ड आपल्या सर्व सभासदांना सहकारी तत्त्वाप्रमाणें व्यवहार करण्याची जाणीव देत आहे. परंतु मोठ्या खेदानें नमूद करावें लागत आहे कीं, अहवालसालीं ज्या प्रमाणांत कर्जफेड व्हावयास पाहिजे त्या प्रमाणांत न झाल्यामुळें बँकेस नवीन कर्जें अगर कॅशक्रेडिट्स मंजूर करणें शक्य झालें नाहीं.

बँकेनें नवीन शेअर-विक्री बंद केली असतांनाहि अहवालसालीं सहकारी सप्ताहानिमित्त फक्त एक दिवस बिगर-सभासदांना प्रत्येकी फक्त एक शेअर मूळ किंमतीस म्हणजे दहा रुपयांस द्यावा असें डायरेक्टर बोर्डानें ठरवून त्याप्रमाणें जाहीर केलें असतां तारीख ७-११-५६ रोजीं नगर येथें व बँकेच्या शाखांचे ठिकाणीं मिळून एकंदर १८९५ लोकांनीं शेअर मागणी केली त्यांपैकी नियमाप्रमाणें ज्यांना सभासद करून घेणें शक्य होतें अशा १३४३ लोकांचे अर्ज डायरेक्टर-बोर्डानें मंजूर करून त्यांना सभासद करून घेतलें.

अहवाल सालीं ऑगस्ट, सप्टेंबरचे सुमारास धान्याच्या वाढलेल्या भावास आळा घालण्याकरितां म्हणून जिल्ह्यांत ठिक-ठिकाणीं बर्मा तांदूळ व ओव्हरसीज गहूं स्वस्त दरानें विक्रीचीं दुकानें काढण्याचें सरकारनें ठरविलें व बँकेची नगर (शहर व कॅन्टोन्मेंट सोडून), पाथर्डी, शेवगांव, जामखेड, कर्जत, श्रीगोंदे, पारनेर, नेवासें व राहुरी या तालुक्यांकरतां होलसेलर म्हणून निवड केली. बँकेनें सदरील मालाचे विक्रीस तारीख १-९-१९५६ पासून सुरुवात करून ता. ३०-६-५७ पर्यंत रु. २,१८,३०१·०८ किंमतीच्या १३६४३ मण ३४ शेर तांदूळ व रु. ३,८३,५८२·५० किंमतीच्या २७३९८ मण ३० शेर गव्हाची विक्री केली.

नगर जिल्ह्यांतील विणकरांच्या व इतर औद्योगिक सहकारी संस्थांना मे. डायरेक्टर ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज अँड ॲडिशनल रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज, पुना यांनीं मंजूर केलेल्या कर्जाचें वांटप करण्यासाठी म्हणून आपल्या बँकेची सेंट्रल फायनॅन्सिंग एजन्सी म्हणून निवड झाल्यामुळें सरकारनें अहवाल-सालीं बँकेकडे एकूण रक्कम रु. २,२७,९२३/- पाठविली. त्यांत मागील सालीं पाठविलेली रक्कम रु. ५०,०००/- मिळवितां एकूण होणाऱ्या रक्कम रु. २,७७,९२३/- मधून अहवालसालीं १९ विणकर सहकारी संस्थांना व तीन औद्योगिक संस्थांना एकूण रक्कम रु. २,०२,२२०/- कर्जाऊ देण्यांत आली असून बाकी रक्कम बँकेकडे शिल्लक आहे.

सन १९२७ पर्यंत नगर बँक सर्व जिल्ह्यांमध्यें शेतकरी, शेतकी व तत्सम सोसायट्या यांना कर्जें द्यावयाचें काम करीत होती. परंतु जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळें बँकेस तें काम झेपणें अशक्य वाटल्यामुळें त्यावेळेपासून मुंबई स्टेट को-ऑप. बँक तें काम करीत आहे. नगर बँकेनें हें काम परत घ्यावें अशी बँकेच्या बोर्डाची मनीषा होती व त्याप्रमाणें एक योजना तयार करण्याचेंहि बोर्डानें ठरविलें होतें. परंतु बऱ्याच विचार-विनिमयानंतर सध्यांच्या वाढत्या व्यापाच्या परिस्थितींत एक वेगळीच नवीन सेंट्रल बँक काढणें जरूर आहे असें वाटल्यावरून ही बँक स्थापन करण्याकरितां एक ७ सभासदांची उपसमिति नेमण्यांत आली आहे. या उपसमितीमध्यें बँकेचे चेअरमन व बँकेचे जनरल मॅनेजर श्री. जोशी सभासद आहेत. उपसमितीनें एक योजना तयार करून रजिस्ट्रारकडे पाठविली आहे व आशा आहे कीं, पुढील २-३ महिन्याचे अवधींत जिल्हा सेंट्रल बँक स्थापन होईल. सुरुवातीस चार लाखांचें भांडवल उभारावें. लागणार आहे. नगर बँकेचा मूळ पाया सेंट्रल बँकेचा असल्यामुळें नवीन निघणाऱ्या सेंट्रल बँकेचे एक लाख रुपयांचे शेअर्स घ्यावयाचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे.

### बँकेचे नवे चेअरमन

श्री. मो. नु. ऊर्फ बाबू शेट बोरा ह्यांची नवीन वर्षाकरितां चेअरमन म्हणून निवडणूक झाली. श्री. मोतीलालजी फिरोदिया ह्यांनीं गेलीं १२ वर्षें बँकेचें काम अत्यंत चोख केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणारीं भाषणें वार्षिक सभेंत करण्यांत आलीं. श्री. बोरा ह्यांनींहि समयोचित भाषण केल्यावर श्री. फिरोदिया ह्यांनीं सर्वांचे आभार मानून नगर जिल्ह्याचा सहकारी क्षेत्रांतील लौकिक वाढविण्याचा पुढेंहि प्रयत्न करीन, असें सांगितलें.

---

## दि सातारा जिल्हा को. ऑ. लँड मॉर्गेज बँक लि.

कराड व सांगली

फक्त सभासदांकरतां वार्षिक सभेची

## नोटीस

सातारा जिल्हा को. ऑ. लँड मार्गेज बँक लि. कराड-सांगली या बँकेची २२ वी वार्षिक साधारण सभा गुरुवार ता. २६।९।५७ रोजीं दुपारीं ३ वाजतां कराड येथें बँकेचे ऑफिसमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सन १९५६-५७ चा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक मंजूर करणें; सन १९५७-५८ करता जमाखर्चाचें अंदाजपत्रक मंजूर करणें; डायरेक्टर्सबोर्डाची निवड जाहीर करणें, मागील वार्षिक सभेंत मंजूर झालेल्या पोटनियमास मे. रजिष्ट्रार साहेब यांची मंजुरी आलेली आहे ती दाखल करून घेणें वगैरे कामांचा विचार होणार आहे; तरी कर्जदार व बिगर-कर्जदार सभासदांनीं अगत्य हजर रहावें अशी विनंती आहे. कळावें.

कराड
१८-८-५७

नीलकंठ आण्णापा कल्याणी
चेअरमन

## दि पेण को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पेण

चेअरमन : नारायण यशवंत नेने

मॅनेजिंग डायरेक्टर : वसंतराय विठ्ठलदास कोठारी

नफ्याचे बाबतींत बँकेच्या स्थापनेपासून अहवालाच्या साल-असेरपर्यंत, बँकेच्या व्यवहारांत सालमजकूर विक्रम झाला असें म्हणण्याचें धाडस व्यवस्थापक मंडळ करीत आहे. अहवालाचे सालांत बँकेला रु. १०,९२१·७० चा निव्वळ नफा झाला आहे. गतवर्षाच्या नफ्यापेक्षा सालमजकूरचा नफा अंदाजे दीड-पटींपर्यंत जास्त आहे.

इन्व्हेस्टमेंटसच्या बाबतींत सुद्धां विक्रम झाला आहे असें म्हणणें क्रमप्राप्तच आहे. कारण अहवालाच्या सालांत सुरवातीच्या सव्वातीन महिन्यांतच बँकेनें रु. ९५,००० ची नवीन गुंतवण सरकारी रोख्यांत केली. ही बाब नजरेंत भरण्यासारखी आहे. त्यामुळें इन्व्हेस्टमेंटमध्यें एकूण रु. ९,२६,८८३ इतकी रक्कम झाली आहे.

ठेवीमध्येंसुद्धां रु. ४१,६४० नें वाढ झाली आहे. त्यामुळें सालअखेर बँकेंत एकूण रु. ३,१८,४४२ च्या ठेवी आहेत. अर्थात् ही वाढ बँकेवरील जनतेचा वाढता विश्वास याचें द्योतक आहे.

खर्चाच्या बाबतींत सुद्धां सभासद बँकेकडून मिळणाऱ्या सवलतींचा फायदा घेतच आहेत हें त्यासंबंधीं आंकड्यांवरून कळून येईल. भाताचे तारणावर देण्यांत आलेल्या कर्जाचा नुसत्या व्यापारी वर्गानेंच उपभोग घेतला असें नसून कांहीं मध्यमवर्गीय व्यक्तीगत सभासदांनींहि योग्य तो उपभोग घेतला आहे.

अहवालाच्या सालांत बँकेचें अधिकृत शेअर भांडवल रु. ५०,००० हें पूर्ण भरपाई झालें आहे हें व्यवस्थापक मंडळ समाधान व अभिमानपूर्वक नमूद करीत आहे. तसेंच सभासदांच्या संख्येंतहि उल्लेखनीय अशी १६२ ची वाढ झाली आहे.

ता. ३०–६–५७ अखेर एकूण मंजूर कर्ज रु. ३,३५,६७३ इतकें आहे. मंजूर कर्जाशीं एकूण थकबाकीचें प्रमाण ५·५८% पडतें व येणें मुद्दल थकबाकीचें प्रमाण ३·८८% पडतें.

अहवालाच्या सालांत बँकेनें 'दि बाँबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक्स् असोसिएशन लि.' चे सभासद होऊन बँकाबँकांतर्गत "म्युच्युअल अॅरेंजमेंट स्कीम" (Mutual Arrangement Scheme) मध्यें दाखल होऊन, मुंबई राज्यांत महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक प्रदेशांतील कुठल्याहि जिल्ह्यांतील कुठल्याहि गांवीं सभासद बँकेवर ड्राफ्ट देण्याची व तेथील ड्राफ्टस्, चेक्स्, बिल्स्, हुंड्या वगैरे वसूल करण्याची सोय केली आहे. त्यामुळें वेळेची बचत होईल. जिल्हेवार गांवांची यादी बँकेच्या ऑफि-सांत पहावयास मिळेल. तरी सभासदांनीं सदर सोयीचा अवश्य फायदा करून घ्यावा. याशिवाय मुंबई व पुणें येथील बँकांवर ड्राफ्ट देण्याची व तेथील ड्राफ्टस, चेक्स्, हुंड्या, बिल्स्, वगैरे वसूल करण्याची पूर्वीची सोय चालूं आहेच. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोठमोठ्या शेड्यूल्ड बँका, चेक्स्, बिल्स्, हुंड्या, मालाची रसीट वगैरे वसुलीकरितां पेण बँकेकडे डायरेक्ट पाठवीत असतात.

**दाक्षिणात्य लेखकांची सोसायटी**—दक्षिण हिंदुस्थानांतील चार प्रमुख भाषांतील लेखकांनीं आपली एक सोसायटी स्थापन केली आहे. लेखकांचे हितसंबंध व हक्क ह्यांची जपणूक करणें आणि भारताच्या सांस्कृतिक समन्वयासाठी प्रयत्न करणें हें संस्थेचे हेतू म्हणून नमूद करण्यांत आले आहेत.


स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर ).
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं २७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,८७,००० |
| ठेवी ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | |
|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, २३/४ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यां-नंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिके-ट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव. एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

## दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड.

(चेअरमन : वृ. न. वैद्य, बी. ए., एलएल. बी.
ऑ. मॅ. डायरेक्टर : पि. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर : मा. गो. धारप, बी. एससी., एच. डी. सी.)

अहवालाचे सालअखेर बँकेचे रिझर्व्ह फंड व इतर फंड यांत वाढ झाल्याचें दिसून येईल. बँकेनें सरकारी रोखे व इतर फंड यांत आपली गुंतविलेली रक्कम पहातां बँकेची स्थिति समाधानकारक असल्याचें नजरेस येईल. त्याबरोबरच बँकेचें शेअर भांडवल गुदस्त सालापेक्षा सुमारें दोन हजारांनीं वाढलें आहे यावरून जनतेचा बँकेचे कार्यावर पूर्ण विश्वास असल्याचें निदर्शनास येईल.

गुदस्त सालचे अहवालांत पोलादपूर येथें बँकेची शाखा उघडण्याच्या प्रश्नाचा उल्लेख आहे. पण शाखा उघडणेस सहकारी खातें अनुकूल नसल्यामुळें तो प्रश्न सोडून दिला आहे. बँकेची स्वतःची इमारत बांधणेंबद्दलचे प्रश्नाचा विचार गुदस्त सालचे रिपोर्टांत होता. त्याप्रमाणें इमारतीस आरंभ होऊन पावसापूर्वी सर्व बाहेरील बांधकाम पुरें होऊन पाणी निघालें आहे. आतां आंतील काम चालू आहे व असा भरंवसा आहे कीं येत्या दिपवाळीपूर्वी सर्व काम पुरें होऊन त्यानंतर लवकरच बँक स्वतःचे इमारतींत जाईल.

बँकेचे एकंदर फंड एक लाखाहून अधिक आहेत. या एका गोष्टीवरून बँकेची स्थिति समाधानकारक असल्याचें सिद्ध होत आहे. सालअखेर निव्वळ नफा रु. ११०६३·५८ झाला आहे.

**भारतामधील साड्यांना मागणी**—१९५९ च्या जुलै महिन्यांत अमेरिकेंतील शिकॅगो शहरांत एक आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन भरणार आहे. प्रदर्शनांत भारतामधील व्यापाऱ्यांनीं व सरकारनें भाग घ्यावा म्हणून खटपट करण्यासाठी शिकॅगो शहराच्या व्यापारी संघटनेचे अध्यक्ष भारतांत आले होते. त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं भारतामधील वस्तूंना अमेरिकेंत चांगली मागणी येईल; विशेषतः साड्या फार खपतील; अमेरिकन स्त्रिया साड्यांसाठी वेड्या झालेल्या आहेत.

**ब्रह्मदेश भारताची यंत्रसामुग्री घेणार**—ब्रह्मदेश सरकारचें एक व्यापारी प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें असून भारताकडून कांहीं माल खरेदी करण्यासाठी भारत सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याशीं तें वाटाघाटी करीत आहे. भारताकडून बराच माल विकत घेण्याचा ब्रह्मी सरकारचा विचार आहे. ह्या मालांत कापड व एंजिनिअरिंगच्या धंद्याची यंत्रसामुग्री ह्यांचा समावेश आहे.


कण आणि क्षण व पुढे पाऊल
ह्या लोकप्रिय व सर्वमान्य पुस्तकांचे लेखक
श्री. वा. काळे
(संपादक, "अर्थ", पुणें ४)
ह्यांचें नवें पुस्तक
तुमचें स्थान कोणतें ?
हें येत्या दिवाळीचे आधीं प्रसिद्ध होईल.
पृ. सं. सुमारें १२०. ★ किंमत २ रुपये.
कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांची मनमोकळी चर्चा ह्या पुस्तकांत वाचण्यास मिळेल. इष्टमित्रांना श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांच्या देणगीनें आपली रसिकता व्यक्त करा !


**१९५६ मध्यें बँकांना कचेऱ्या उघडण्यास परवानगी कोठें दिली व कोठें नाकारली**

| | किती ठिकाणीं परवानगी दिली | किती ठिकाणीं परवानगी नाकारली |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| आंध्र प्रदेश | ३५ | १ |
| आसाम | १ | |
| बिहार | ६ | |
| मुंबई | ४१ | ५ |
| केरळ | ४ | १ |
| मध्य प्रदेश | २२ | ३ |
| मद्रास | ४६ | २९ |
| म्हैसूर | ६ | १ |
| ओरिसा | ८ | |
| पंजाब | ४ | १ |
| राजस्थान | ५ | |
| उत्तर प्रदेश | १५ | |
| प. बंगाल | ७ | |
| जम्मू काश्मीर | १ | |
| दिल्ली | ७ | ६ |
| हिमाचल प्रदेश | २ | |
| त्रिपुरा | १ | |
| एकूण | २११ | ४७ |

**पाकिस्तानचा पोलादाचा कारखाना**—पाकिस्तान सरकारनें आपल्या मालकीचा पोलादाचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी परदेशी भांडवल मिळूं शकेल किंवा काय हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. पण परदेशी भांडवल न मिळाल्यास जरूर तें सर्व भांडवल पाकिस्तानांतच गोळा करण्यांत येईल, अशी माहिती पाकिस्तानच्या व्यापार व उद्योग-मंत्र्यांनीं सांगितली.

**कम्युनिस्ट देशांची घासाघीस**—मळ्यांसंबंधीं नेमलेल्या चौकशी कमिटीच्या अहवालावर चर्चा चालू असतां एका कम्युनिस्ट खासदारानें व्यापारमंत्र्यांना असें विचारलें कीं, पूर्व युरोपांतील देशांना अधिक चहा विकण्याचा प्रयत्न कां करण्यांत येत नाहीं ? त्यावर मंत्र्यांनीं उत्तर दिलें कीं कम्युनिस्ट देश घासाघीस फार करतात व माल स्वस्त मिळेल तेथूनच घेतात.


"अर्था"चा दिवाळी अंक
"अर्था"चा दिवाळी अंक प्रतिवर्षीप्रमाणें प्रसिद्ध होऊन तो ऐन दिवाळींत ग्राहकांच्या हातीं येईल. ह्या दिवाळी अंकाचीं वैशिष्ट्यें प्रत्यक्ष त्या अंकांतच पहा.
जाहिरातदार-सहकाऱ्यांनीं आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंति आहे.
—संपादक

## दि इस्लामपूर को-ऑ. पीपल्स बँक, लि. इस्लामपूर

(चेअरमन : एम. डी. पवार)
(मॅनेजर : डी. डी. लाटकर)

अहवालाचे साली नवीन सभासद १२ झाले असून, ५ सभासद कमी झाले आहेत व एकूण सभासदसंख्या ५२० झाली आहे. अहवालाचे सालीं बँकेकडे सभासद व बिगर-सभासद यांच्या एकूण ठेवी ४,८७,६४४ रु. झाल्या. बँकेनें रु. ४,३४,४४१ च्या ठेवी परत केल्या. सालअखेर बँकेकडे एकूण ठेवी १,६१,२८६ रुपयेच्या शिल्लक आहेत. अहवालाचे सालीं बँकेनें सभासदांकडून ७०,६७८ रु. चीं कर्जें वसूल केलीं. त्याचप्रमाणें सभासदांना ८९,०६८ रुपयेचीं नवीन कर्जें दिलीं. सालअखेर सभासदांकडून एकूण कर्जें १,०९,४११ रुपयांचीं येणें आहेत.

थकबाकी कर्जदार सभासदांनीं जर वेळेवर कर्जाची फेड केली असती तर व्याज अनामतची रक्कम सहाजीकच कमी झाली असती व नफ्याचा आंकडा ९,००० रु. चे वर गेला असता. थकबाकी कर्जदार सभासदांनीं आपली थकलेली कर्जाची रक्कम बँकेच्या पुढील उत्कर्षासाठी ताबडतोब भरणेची तजवीज करावी अशी बोर्डाची कळकळीची विनंति आहे.

### पूना बँकर्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

पूना बँकर्स असोसिएशनची वार्षिक सभा पुणें सेंट्रल को. बँकेंत भरून पुढील वर्षाकरितां खाली दिल्याप्रमाणें कार्यकारी मंडळाची निवड करण्यांत आली.

**कार्यकारी मंडळाचे सभासद**

श्री. सी. व्ही. जोग (बँक ऑफ महाराष्ट्र लि.)
श्री. जी. जी. साठे (बँक ऑफ पूना लि.)
श्री. के. बी. मुजुमदार (देवकरण नानजी बँकिंग कं. लि.)

**सेक्रेटरीज**

श्री. दा. ना. गांडेकर (बँक ऑफ महाराष्ट्र लि.)
श्री. वा. ग. आळतेकर (पुणें सेंट्रल को. बँक लि.)

**हिशेब तपासनीस**

श्री. भ. ग. साबणे (पुणें मर्चंटस को. बँक लि.)

**इंडिअन हिस्टरी कॉंग्रेसचें अधिवेशन**—इंडिअन हिस्टरी कॉंग्रेसचें अधिवेशन गुजरातमधील वल्लभ विद्यानगर येथें २९ डिसेंबरपासून १ जानेवारीपर्यंत भरणार आहे. त्याचवेळीं पदार्थ-संग्रहालयें व प्राचीन नाणीं ह्या विषयांच्या संस्थांचीं अधिवेशनेंहि भरविण्यांत येणार आहेत.

**इजिप्त भारताकडून चहा घेणार**—आपल्या ताबडतोबीच्या गरजा भागविण्यासाठी इजिप्त भारताकडून पुढील कांहीं आठवड्यांत १,७०० टन चहा घेणार आहे. गेल्या वर्षी भारतामधील निर्यात व्यापाऱ्यांनीं १·५ कोटी रुपये किंमतीचा चहा इजिप्तला निर्यात केला होता. चहाच्या किंमतींपैकी ७५ टक्के रक्कम भारताच्या व्यापाऱ्यांना ताबडतोब देण्यांत येणार आहे.

**गेल्या हंगामांतील साखरेचें उत्पादन**—साखर कारखान्यांच्या गेल्या हंगामांत ऑगस्टअखेर २०·२१ लाख टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें. गेल्या वर्षी ह्याच कालांत १८·५६ लाख टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें होतें. सप्टेंबरच्या १० तारखेपर्यंत १,२५,००० टन साखर निर्यात करण्यांत आली.


# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,७१,५०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,६१,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली, चेअरमन
श्री. एम. बी. चौगुले, शाहूपुरी—कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्जे मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाच्या दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

(१) सदाशिव पेठ, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४५५ रविवार पेठ, पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.